# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## माहिती आणि जनसंपर्क विभाग

## प्रेसनोट

- **केंद्र व राज्य शासनाचे स्वच्छ भारत अभियान व माझी वसुंधरा अभियान अंतर्गत वोक्हार्ट सायक्लोथॉन २०२४ चे आयोजन**

मिरा-भाईंदर महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर यांच्या विशेष मार्गदर्शनाने माझी वसुंधरा आणि स्वच्छ भारत अभियान २.० अंतर्गत वोक्हार्ट हॉस्पिटलच्या सहकार्याने जागतिक हृदय दिवसानिमित्त ३० आणि १५ किलोमीटर लांबीचे वोक्हार्ट सायक्लोथॉन २०२४ याचे आयोजन केलं होतं. यावर्षीचे हे सलग तिसरे वर्ष होते.

मिरा-भाईंदर शहरातील जवळजवळ १३०० सायकलस्वारांनी या वोक्हार्ट सायक्लोथॉनला उत्स्फूर्त प्रतिसाद देत आनंदाने सहभाग घेतला. सायकलिंग हे प्रदूषण कमी करणारे आणि निरोगी जीवनशैलीला प्रोत्साहन देणारे एक टिकाऊ, पर्यावरणपूरक वाहतूक साधन आहे म्हणूनच तिच्या माध्यमातून मिरा-भाईंदर शहराला हृदय आजाराच्या बचाव बाबतीत जनजागृती करण्याचा हा एक प्रयत्न करण्यात आला.

वोक्हार्ट सायक्लोथॉन २०२४ चा मार्ग वोक्हार्ट हॉस्पिटलपासून सुरु होऊन तिथेच संपला होता. या मार्गामध्ये मॅक्सस मॉल, उत्तन सर्कल, आणि गोराई क्रॉस चौक यांसारख्या महत्त्वाच्या ठिकाणांचा समावेश होता. हे 15 किमी आणि 30 किमीचे सायकलिंग इव्हेंट केवळ हृदयाच्या आरोग्यासाठीच नव्हे तर केंद्र व राज्य शासनाचे स्वच्छ भारत अभियान व माझी वसुंधरा अभियानात सायकल चालविणे बाबत पर्यावरण पूरक जनजागृती करणे व जास्तीत जास्त सायकलचा वापर करून पर्यावरणाचा समतोल राखणे हा देखील उद्देश होता.

मिरा भाईंदर चे आयुक्त यांनी स्वतः सायकल चालवत या वोक्हार्ट सायक्लोथॉन २०२४ चे प्रतिनिधित्व केल्यामुळे सगळ्या सायकलस्वारांमध्ये एक वेगळाच उत्साह आणि आनंद होता. आयुक्तांच्या समवेत उपायुक्त सचिन बांगर, उपायुक्त (मुख्यालय) संजय दोंदे, उपायुक्त प्रसाद शिंगटे, सहाय्यक आयुक्त योगेश गुणीजन, स्वच्छ सर्वेक्षण २०२४ चे ब्रॅण्ड ॲम्बेसेडर अभिनेत्री दिपीका सिंग तसेच मिरा-भाईंदर महानगरपालिकेचे स्वच्छता निरीक्षक, इतर पदाधिकारी आणि कर्मचारी यांनी हि सायकल चालवत या वोक्हार्ट सायक्लोन २०२४ मध्ये आपला लक्षणीय सहभाग नोंदवला.

मिरा भाईंदर शहरातील लोकांमध्ये हृदय आणि त्या संदर्भातील आजाराची जनजागृती व्हावी आणि कमीत कमी लोकांना हृदयरोगाचा सामना करावा लागावा आणि शहरातील प्रत्येक नागरिक सुदृढ सशक्त असावा एवढी मापक अपेक्षा या नियोजनामागे होती.

मिरा-भाईंदर महापालिकेने आयोजित या वोक्हार्ट सायक्लोन मध्ये दरवर्षी अशीच सायकलस्वारांची भर पडत राहो आणि मिरा-भाईंदर शहरात सोबतच भारताच्या प्रत्येक नागरिकांचे हृदय सुदृढ राहून त्यांना निरोगी आयुष्य लाभत देश विकासाच्या आणि प्रगतीच्या दिशेने जावो अशा मनस्वी शुभेच्छा मा.आयुक्तांनी जमलेल्या सगळ्या जनसमुदायाला दिल्या.